अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार

आचार्य बाळशास्त्री जांभेकर

पत्रकार दिन

यांच्या जयंतीमित्त विनम्र अभिवादन!


www.surajyadigital.com | शनिवार, दि. ६ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ८८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


शरद मोहोळ या गँगस्टरचा खात्मा

# गँगवारचा भडका; कोथरूडमधील थरार गोळ्या झाडून कुख्यात गुंडाची हत्या



## • सोबत असणाऱ्यानेच केला 'गेम'; आनंदाच्या दिवशीच संपवले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यात सुसंस्कृतीचे शहर म्हणून ओळख असलेल्या पुण्यात गँगवारचा पुन्हा भडका उडाला आहे. कोथरूडमध्ये शुक्रवारी भर दुपारी खून, खंडणी, धमकावणे या गुन्ह्यातील तडीपार असणार कुख्यात गँगस्टर शरद मोहोळ(वय ४०) याची अज्ञात इसमांनी गोळ्या झाडून हत्या केली. शरदवर समोरून पिस्तूलमधून तीन गोळ्या झाडल्या गेल्या. रक्ताच्या थारोळ्यातच त्याला उपचारासाठी जवळच्या खाजगी रूग्णालयात हलवण्यात आले मात्र उपचार सुरू असतानाच त्याने मान टाकली. या प्रकाराने पुणे शहरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी तपासाची चक्रे तातडीने फिरवून तिघा संयशयितांपैकी एकाला ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. शरदच्या सोबत असलेला साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर (रा,सुतारदरा, कोथरूड) याने आणि त्याच्या इतर साथीदारांनी गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. शरदचा शुक्रवारी लग्नाचा वाढदिवस होता.या आनंदाच्या दिवशीच त्याला संपवण्यात आले. अगोदरच कोयत्या गँगकडून माजवली जाणारी दशहत, दिवसाढवळ्या तरूणांची हत्या, प्रेम प्रकरणातील मुला-मुलींची आत्महत्या अशा गुन्ह्यातील घटनांनी जरीस आलेल्या पुण्यात टोळी युद्धाचा भडका उडाल्याने पोलीस दलही पार हादरून गेले आहे.**

शरद हा कोथरुडमधील सुतारदरा या ठिकाणी जात असताना दुचाकीवरुन आलेल्या अज्ञातांनी त्याच्या दिशेने चार गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी त्याच्या खांद्याला लागली. गंभीर जखमी झालेल्या शरदवर कोथरुडमधीलच खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. हा जीवघेणा कुणा केला ? हा हल्ला एखाद्या टोळीने अथवा पूर्ववैमन्यस्यातून झाला का? याची अद्याप कोणताही माहिती समोर आलेली नाही. पोलिस या घटनेचा कसून तपास करत आहेत. शुक्रवारी भरदुपारी कोथरुडमध्ये दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास हा संपूर्ण प्रकार घडला. गोळया झाल्यानंतर आरोपी पसार झाले आहेत.


कसे जन्माला आले पुण्यातले गँगवॉर?

पान ३ वर


हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी तपास पथके रवाना करण्यात आल्याची माहिती कोथरूड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हेमंत पाटील यांनी दिली. कोथरुडमधील सुतारदरा या ठिकाणी घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी सुरु केली आहे. गोळीबार झाल्यानंतर कोथरुड परिसरात भीतीचे वातावरण पसरले. शरद हा पुण्यातील कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्यावर हत्या, हत्येचा प्रयत्न, खंडणी, अपहरण यासारखे गुन्हे दाखल आहेत. पिंटू मारणे हत्येप्रकरणी त्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या होत्या. याप्रकरणात तो जामिनावर बाहेर आला होता. पण दासवे गावचे सरपंच शंकर धिंडले यांचे अपहरण केल्याप्रकरणात पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या होत्या. त्याच्यावर अनेक गुन्ह्याची नोंद आहे. जुलै २०२२ मध्ये त्याला पुणे जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी तडीपार करण्यात आले होते. येरवडा कारागृहात त्याने आणि विवेक भालेराव या दोघांनी मिळून जर्मन बेकरी दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी असल्याचा आरोप असलेल्या कतील सिद्दीकिचा खून केला. या प्रकरणात मागील वर्षी शरदला जामीन मिळाला.



मात्र बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा गुन्हेगारी कृत्य सुरु केले. खंडणीसाठी धमकावल्याबद्दल त्याच्यावर पुण्यातील खडकमाळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. त्यानंतर जुलै २०२२ मध्ये त्याला पुणे जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले होते. मधल्या काळात अहमदनगर जिल्ह्यातील राहुरीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत त्याचा फोटो व्हायरल झाल्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयाकडून त्याच्याविरुद्ध तक्रार देण्यात आली आणि पुणे पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला होता.

**शरद आहे तरी कोण? :** पत्नीमार्फत भाजपमधून राजकारणात प्रवेश करणारा शरदची सर्वत्र चर्चा सुरू झालीय. त्याची पत्नी स्वाती मोहोळ यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. मात्र त्याने पत्नीच्या मार्फत भाजपमधून राजकारणात उतरल्याचे सांगितले जाते. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश झाला होता. गुंडाच्या पत्नीने भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले होते. मोहोळ आणि त्याच्या टोळीचे वर्चस्व हे पुण्यातील कोथरुड परिसरात आहे. त्यात परिसरात चंद्रकांत पाटील आमदार आहेत. त्यासोबतच मुरलीधर मोहोळ हे देखील याच परिसरात राहतात. आगामी निवडणुकांसाठी शरद मोहोळ यांची नेत्यांना गरज भासू शकते. यामुळे हा प्रवेश केला गेला असावा, अशी शंका होती.

**समाजकारणातून राजकारणाकडे... :** ज्या मुळशी पॅटर्न चित्रपटाने पुण्यातील आणि मुळशी खोऱ्यातील गुन्हेगारीची जगताची ओळख झाली, त्याच मुळशी तालुक्यातील शरद मोहोळ होता. गुंड संदीप मोहोळचा ड्रायव्हर म्हणून तो काम करत होता. मात्र, याच संदीप मोहोळची हत्या झाल्यानंतर तो गुन्हेगार म्हणून नावारुपास आला. शरदचे आई वडील शेतकरी असून बेताच्या परिस्थितीत मोठा होऊनही तो गुन्हेगारीकडे वळला होता. गुंडगिरीचा धंदा असूनही शरदला राजकारणाचे वेध लागले होते. त्याने आपली प्रतिमा निर्मिती करण्यासाठी सामाजिक कार्यक्रम सुद्धा राबवण्यास सुरुवात केली होती. मात्र, राजकारणातील प्रवेश होण्यापूर्वीच आता त्याचा दिवसाढवळ्या गेम झाला आहे.तो किमान १५ गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकला होता. अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये मोहोळ जोडपे दिसले होते.

## शेअर मार्केटमधून पैसे मिळवून देतो म्हणून ५१ लाखांची केली फसवणूक

सुराज्य/सांगोला

शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविल्यास तुम्हाला प्रचंड पैसा मिळवून देतो असा विश्वास देवून गुंतवलेल्या रक्कमेपैकी ५१ लाख २० हजार रुपये रक्कमेचा परतावा न करता पिता पुत्रांनी सांगोला येथील गुंतवणूकदाराची फसवणूक केली त्यांनी एवढ्यावरच न थांबता गुंतवणूकदारास अरेरावीची भाषा वापरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून गुंतवलेल्या पैशाची मागणी केल्यास तुमची काही खैर नाही अशी दमदाटी केली.



याबाबत, राजेश बंडा माळी (मस्के कॉलनी, सांगोला) यांनी प्रतिक पांडुरंग कुलकर्णी व पांडुरंग सर्वोत्तम कुलकर्णी या पिता पुत्राविरुद्ध पोलिसात तक्रार दिली आहे. तक्रारदार राजेश माळी यांचा मुलगा अजित हा नीटच्या तयारीसाठी लातूर येथे सन २०१९ मध्ये शिक्षण घेत होता. त्या ठिकाणी त्याची प्रतीक पांडुरंग कुलकर्णी यांच्याशी ओळख झाली. त्यावेळी प्रतीकने अजित यास शेअर मार्केटच्या बिझनेसमध्ये मी प्रचंड पैसे मिळवल्याचे त्यास सांगितले. याबाबत अजितने वडील राजेश माळी यांना सांगून प्रतीकचे फोनवरून बोलणे करून दिले तदनंतर प्रतीक व राजेश माळी यांची २०२० मध्ये प्रत्यक्षात भेट झाली त्यामध्ये त्याने त्याच्यामार्फत शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्याची त्यांना गळ घालून तुम्ही गुंतवलेल्या पैशावरती २० टक्के प्रमाणे नफा मिळेल व तुम्ही गुंतवलेली रक्कमही तुम्हाला परत मिळेल अशी ग्वाही दिली. प्रतीकाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून राजेश माळी यांनी सुरुवातीला २५ हजार रुपयाची गुंतवणूक केली. त्याने त्यांना विश्वासात घेण्याकरता २५ हजार रुपयेसह ५ हजार रुपये नफा परतावा म्हणून त्यांना परत दिला त्यानंतर त्यांचा विश्वास बसल्याने पुन्हा त्यांनी १ लाख २५ हजार रुपये त्यास पाठवले त्यावरही प्रतिकने सुरुवातीला ८ महिने आश्वासनाप्रमाणे गुंतवणूक केलेल्या रक्कमे पोटी २० टक्के प्रमाणे नफा परताव्यासह २ लाख रुपये देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. नंतर राजेश माळी यांनी ११ ऑक्टोंबर०२१ ते २ फेब्रुवारी ०२२ यादरम्यान ७६ लाख ५० हजार रुपये प्रतिक कुलकर्णी यांच्या भूम येथील आयडीबीआय व बार्शी येथील एसबीआय बँक खात्यावरती पाठवली. गुंतवलेल्या रकमेवर पाच महिन्यात त्याने २३ लाख २५ हजार रुपये परतावा म्हणून त्यांच्या खात्यावर पाठवले. परंतु राजेश माळी यांनी गुंतवलेल्या एकुण ७६ लाख ५० हजार रुपयेपैकी प्रतीक कुलकर्णी यांच्याकडून ५१ लाख २० हजार रुपये अद्यापपर्यंत त्याच्याकडून मिळाले नाहीत म्हणून त्यांनी त्यास वेळोवेळी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून गुंतवली रक्कम परत मागितलीअसता रक्कम परत देण्यास चालढकल करून फसवणूक केली.

## बारामती ॲग्रोवर ईडीची धाड; सहा ठिकाणी तपास सुरू

सुराज्य/बारामती

शरद पवारांचे नातू आणि आमदार रोहित पवारांच्या बारामती ॲग्रोवर सक्तवसुली संचलनालयाची (ईडी) धाड पडल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. शुक्रवारी (दि. ५ जानेवारी) सकाळी ईडीचे पथक बारामती ॲग्रोमध्ये पोहोचले. या कंपनीच्या कार्यालयात अन्य लोकांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. आमदार रोहित पवार यांची ही कंपनी आहे.



अजित पवार राज्य सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर पवार कुटुंबात उभी फूट पडली आहे. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. पण शरद पवारांचे नातू आणि आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे थोरल्या पवारांसोबतच राहिल्या. विरोधी पक्षात असलेल्या रोहित पवारांच्या कंपन्या केंद्रीय व राज्यातील यंत्रणांच्या रडारवर आहेत. दरम्यान या प्रकरणी कंपनी प्रशासनानं कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही. केंद्रीय तपास यंत्रणांकडूनही अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कन्नड सहकारी साखर कारखान्या बाबत ईडीकडे तक्रार केली होती. हा कारखाना आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीने केवळ ५० कोटी रुपयांमध्ये लिलावात खरेदी केला असून या लिलाव प्रक्रियेत मॅन्युप्युलेशन झाल्याचा त्यांचा दावा होता. किरीट सोमय्या यांनी १ जुलै २०२१ ला रोहित पवार यांच्याविरोधात ट्विट केलं होतं. बारामती ॲग्रो कंपनीने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या लिलावात फेरफार करुन कन्नड सहकारी साखर कारखाना अवघ्या ५० कोटी रुपयात खरेदी केला होता.

## डॉक्टराच्या घरातील दोन लाखांचा ऐवज चोरट्यांनी लांबवला

सुराज्य/सोलापूर

कॅन्सर हॉस्पिटल परिसरात डॉ. अभिनव अशोक इंगळे यांच्या बंद घराचा दरवाजा तोडून कपाटातील साडेचार तोळ्यांचे दागिने व रोख पाच हजार असा दोन लाखांचा ऐवज पळवल्याची घटना घडली.

झोपेत असलेल्या डॉक्टर कुटुंबास शेजाऱ्यांनी फोन करून उठवले. घडलेला प्रकार निदर्शनास आला. चोरीची ही घटना शुक्रवार, ५ जानेवारी २०२४ रोजी पहाटे घडली. याबाबत शहर पोलिसात डॉ. अभिनव इंगळे (लक्ष्मीनगर, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी डॉ. इंगळे हे येथील एका खासगी रुग्णालयात सेवा बजावत आहेत. गुरुवारी कामावरून आल्यानंतर जेवण उरकून सारेजण झोपी गेले. शुक्रवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घरमालकांनी फोन करून डॉक्टर इंगळे यांना जागे केले. घराच्या गेटसमोर कपडे, कागदपत्रे, अस्ताव्यस्त पडल्याचे सांगितले. फिर्यादी बाहेर येऊन पाहताच घराच्या लाकडी दरवाजाची कडी तुटलेली व साहित्य बाहेर पडलेले दिसले. आत डोकावले असता बेडरूममधील कपाट उघडे दिसले. कपडे अस्ताव्यस्त पडलेले पाहून कपाट तपासले तेंव्हा सोन्याचे दागिने व पत्नीच्या पर्समधील पाच हजार रुपये चोरट्यांनी लांबविल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी १२ ग्रॅमचा लॉकेट, १० ग्रॅम सोन्याची मिनीगंठन, १८ ग्रॅमच्या सोन्याच्या तीन अंगठ्या, दोन ग्रॅमच्या कानातील टॉप्स, १ ग्रॅमचे हातातील मनगट, चांदीचे २६ भार दागिने असा एकूण दोन लाखांचा ऐवज चोरीस गेला.




**श्वान पथकाला पाचारण**

याची माहिती मिळताच बार्शी शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेनंतर पोलिसांनी सोलापूर येथून श्वान पथकास पाचारण केले. घटनास्थळी आलेले श्वान घराच्या आसपास घुटमळत राहिले, तर फिंगर प्रिंट पथक येऊन ठसे घेऊन गेले. चोरीचा तपास सहायक पोलिस फौजदार अजित वरपे करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बेताल वक्तव्य, यांच्या जिभेला हाड नसतं!


कल्याण
480-25-690

मुंबई
670-34-338


## सोलापूरकरांनी हाताने विणलेले वस्त्र प्रभू श्रीरामांच्या मूर्तीला अर्पण करणार

सुराज्य/सोलापूर

**शेकडो वर्षानंतर आयोध्या मध्ये प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. त्या मूर्तीसाठी सोलापूरकरांनी हाताने विणलेले वस्त्र प्रभू श्रीरामांच्या मूर्तीला घालण्यात येणार आहे. हे आपणा सर्वांसाठी भाग्याचे लक्षण आहे. त्यामुळे सोलापूरकरांनी विवेकानंद केंद्राच्या 'धागा विणूया श्रीरामासाठी' या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले.**

या उपक्रमाचा शुभारंभ शुक्रवारी करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी, वालचंद शिक्षण समूहाचे प्रमुख डॉ. रणजीत गांधी, आमदार सुभाष देशमुख, उद्योजक व केंद्राचे नगर संचालक दीपक पाटील, चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष राजू राठी, सोलापूर जिल्हा यंत्रमाग संघटनेचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. शोभाताई शहा आदी उपस्थित होते.

हा उपक्रम ५ ते १४ जानेवारी दरम्यान वालचंद महाविद्यालय समोरील श्री पंचमुखी हनुमान मंदिर येथे चालणार आहे. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत हा उपक्रम चालणार असून सर्व सोलापूरकरांनी यात सहभागी होण्याचे आवाहन विवेकानंद केंद्रातर्फे करण्यात आले. सोलापुरातून हाताने विणले जाणारे वस्त्र प्रभू रामचंद्राला अर्पण होणार आहेत. या उपक्रमात तयार झालेले वस्त्र प्रभू श्री रामांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सदर उपक्रमास अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोशाध्यक्ष स्वामी श्री गोविंद देव गिरी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



यावेळी धवल भाई शहा, रंगनाथ बंकापुरे, अंबादास नक्का, ज्ञानेश्वर म्याकल, पंचमुखी हनुमान मंदिराचे विश्वस्त राजमहिंद्र कमटम, सत्यनारायण गुर्रम, विवेकानंद केंद्राचे सर्व कार्यकर्ते, महाविद्यालय तरुण तरुणी, यंत्रमाग कामगार आणि नागरिक उपस्थित होते.


## छगन भुजबळ पंढरपुरात

### आज ओबीसी महाएल्गार मेळावा

सुराज्य/सोलापूर

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ हे शुक्रवारी, ५ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता पंढरपुरात येत आहेत. रात्री त्यांचा पंढरपुरात मुक्काम असून उद्या ते पंढरपुरात आयोजित ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभेला हजेरी लावणार आहेत.

शासकीय वाहनाने मंत्री भुजबळ हे आज दुपारी चार वाजता सांगलीहून पंढरपूरकडे रवाना होणार आहेत. रात्री ८ दरम्यान त्यांचे पंढरपुरात आगमन होईल. शासकीय विश्रामगृहात त्यांचा मुक्काम असून उद्या दुपारी ४ वाजता



पंढरपुरात आयोजित ओबीसी आरक्षण बचाव एल्गार सभेला ते हजेरी लावणार आहेत.

जिल्ह्यातील गावोगावच्या ओबीसी समाजाला निमंत्रणं पोहोचली आहेत. पंढरपूरचा ओबीसी मेळावा विक्रमी होणार, असा दावा ओबीसी नेते माऊली हळणवर यांनी केला आहे. कोणी छगन भुजबळ किंवा गोपीनाथ पडळकर यांना अडवण्याचा प्रयत्न केला, तर त्याला तुडवून काढू, असा इशारा माऊली हळणवर यांनी दिला आहे.